नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १२८ | Issue - 128 | वार गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ | Blow- Thursday Date 25 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

संकटकाळात राज्य शासन पूरग्रस्तांच्या पाठीशी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी; सर्वोतोपरी मदत करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले दिसून येत आहे. शेती पिकांचे जनावरांचे घरांचे व्यावसायिकांचे खूप मोठे नुकसान झालेले असून पूरग्रस्त नागरिकांनी अशा संकटाच्या काळात धीर धरावा, राज्य शासन संकटकाळात पूरग्रस्तांच्या पूर्णपणे पाठीशी असून नागरिकांना सर्वोतोपरी मदत केली जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यातील निमगाव तसेच दारफळ सीना या गावाला भेट देऊन पुरामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी केली, त्यांनी दोन्ही गावातील नागरिकांशी संवाद साधला. याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार रणजीत मोहिते पाटील, आमदार

अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या प्रत्येक नागरिकांना मदत करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त डॉ चंद्रकांत पुलकुंडवार, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, अतिवृष्टी व पूर आल्यामुळे ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या सर्वांना शासनाकडून मदत दिली जाणार आहे. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पूरग्रस्तांना तातडीची मदत म्हणून दोन हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापुढेही पूरग्रस्तांना आवश्यक मदत देण्यासाठी शासन हात आखडता घेणार नाही. शासन टंचाई काळात ज्या निकषाप्रमाणे मदत करते त्याप्रमाणेच अती पावसात, ओल्या दुष्काळात ही मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

दारफळ गावात पुरामुळे मोठे नुकसान झाले असून नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने नदीने पात्र बदलले आणि गावाचा मोठा भाग पाण्यात गेला, तसेच लोकांच्या घरात पाणी शिरले. त्यामुळे घरांचे, अन्नधान्याचे नुकसान झाले आहे. शेती, जनावरांचे नुकसान झाले आहे.

शासन शेती, घरादारांकरिता, अन्नधान्य आदींसाठी मदत करणार असून रस्ते, शाळा, शेतरस्ते, वीजव्यवस्था आदी सुविधांसाठीही आवश्यक ती सर्व मदत करणार आहे. व्यावसायिकांनाही नुकसानीसाठी स्वतंत्र मदत करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माढा तालुक्यातील निमगाव येथे नुकसानीची पाहणी केली आणि नागरिकांच्या व्यथा जाणून घेतल्या. या संकटातून बाहेर पडण्यासाठी नागरिकांना आवश्यक मदत करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सीबीएसईकडून दहावी आणि बारावीच्या संभाव्य वेळापत्रक जाहीर, यंदा परीक्षा दोन टप्प्यात होणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डानं २०२६ साठी दहावी आणि बारावीच्या संभाव्य तारखा जाहीर केल्या आहेत. सीबीएसईनं दहावी आणि बारावीचं संभाव्य वेळापत्रक जारी केलं आहे. बोर्डाच्या अधिकृत नोटीसनुसार पहिल्या टप्प्यातील १७ फेब्रुवारी २०२६ ला परीक्षा सुरु होईल. दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा १५ जुलै २०२६ ला संपेल. या वेळी मुख्य परीक्षेसह विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा आयोजित केल्या जाणार आहे. दहावीची दुसरी परीक्षा आणि बारावीची पुरवणी परीक्षा देखील आयोजित केली जाणार आहे.

सीबीएसईच्या संभाव्य डेटशीट नुसार, दहावीच्या बोर्ड परीक्षेचा पहिला टप्पा १७ फेब्रुवारीला सुरु होईल तो ६ मार्च २०२६ ला संपेल. दहावीची दुसरी बोर्ड परीक्षा १५ मे रोजी सुरु होईल ती १ जूनला संपेल. बारावीची बोर्ड परीक्षा १७ फेब्रुवारीला सुरु होईल ती ९ एप्रिल २०२६ ला संपेल. सीबीएसईच्या परिपत्रकानुसार भारतात जवळपास ४५ लाख विद्यार्थी या परीक्षांना बसतील. देशातील २०२४ विषयांसह विदेशातील २६ देशात परीक्षा आयोजित केली जाणार आहे. बोर्डानं हे देखील सांगितलं आहे. हे वेळापत्रक संभाव्य आहे. शाळांकडून विद्यार्थ्यांची अंतिम यादी प्रस्तुत केल्यानंतर अंतिम वेळापत्रक जारी केलं जाणार आहे. सीबीएसईनं हे स्पष्ट केलं की परीक्षानंतर मूल्यांकन प्रक्रिया वेळेवर सुरु केली जाणार आहे. प्रत्येक विषयाच्या परीक्षेनंतर दहा दिवसांनी उत्तर पत्रिका तपासणी सुरु होईल आणि ती १२ दिवसात संपणार आहे.उदा. १२ वीच्या भौतिकशास्त्राचा पेपर २० फेब्रुवारीला झाला तर उत्तर पत्रिका तपासणी ३ मार्चला सुरु होईल आणि १५ मार्चला संपेल. बोर्डानं संभाव्य वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी जारी केलं आहे. परीक्षांची तयारी सुरु करण्यासाठी आणि प्रात्याक्षिक परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे.

ॲमेझॉनच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राज्याच्या प्रगतीला हातभार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्र हे गुंतवणुकदारांसाठी देशाचे आकर्षण आहे. स्वित्झर्लंड मधील दावोस येथे झालेल्या जागतिक अर्थ परिषदेतही महाराष्ट्राने सर्वाधिक गुंतवणूक आणली. या परिषदेतच मेझॉनने राज्यात ' क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्टर' क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याचा सामंजस्य करार केला होता. त्यानुसार मेझॉन गुंतवणूक करीत आहे. यापुढेही राज्याच्या प्रगतीमध्ये मेझॉन कंपनीची गुंतवणूक महत्त्वाची ठरणार असून कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राज्याच्या प्रगतीला हातभार लागेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वर्षा निवासस्थानी अमेझॉन वेब सर्व्हिसेस कंपनीच्या मुंबईतील डेटा सेंटर चे दूरदृश्य प्रणालीद्वारे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. मेझॉन वेब सर्व्हिसेस कंपनीने राज्यात पहिल्या टप्प्यातील ८.३ बिलियन डॉलर गुंतवणुकीचा या उपक्रमाद्वारे शुभारंभ केला आहे. यावेळी मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, मेझॉन वेब सर्व्हिसेस (पब्लिक पॉलिसी) शाखेचे जागतिक उपाध्यक्ष मायकल पुंके, दक्षिण आशिया व भारताचे अध्यक्ष संदीप दत्ता, आशिया पॅसिफिक क्षेत्राचे संचालक विक्रम श्रीधरन, कंपनीच्या भारतातील पायाभूत सोयी सुविधा क्षेत्राचे संचालक आदित्य चौधरी, तसेच गायत्री प्रभू, शुभंकर दास, रीना मरांडा आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्य शासन उद्योजकांना राज्यात उद्योग स्थापन करणे सहज व सोपे होण्यासाठी विविध योजनांवर काम करीत आहे. उद्योगांना लागणाऱ्या परवान्यांचा कालावधी कमी करणे, प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी 'इज ऑफ डूईंग बिजनेस' वॉर रूम च्या माध्यमातून जलद गतीने कार्यवाही होत आहे. उद्योजकांना परवानगीसाठी दिलेल्या प्रस्तावांची 'रिअल टाइम इन्फॉर्मेशन' देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

यावेळी मेझॉनच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अमेरिकेतील सिएटल येथील कंपनीच्या मुख्यालयाला भेट देण्याचे निमंत्रणही देण्यात आले. राज्यात वीज, पाणी पुरवठा, शिक्षण, कौशल्य विकास या क्षेत्रात सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची सादरीकरणाद्वारे माहिती यावेळी देण्यात आली.

तसेच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते मेझॉन मोबाईल स्टेम लॅब उपक्रम अंतर्गत भारतातील पहिल्या ' थिंक बिग मोबाईल व्हॅन' चे हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले. ही व्हॅन मुंबई शहरात विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने विविध संशोधन, नव विचारांनी शिक्षित करणार आहे.

विद्यार्थ्यांनी भाजप कार्यालय पेटवलं, पोलिसांवर दगडफेक | **सीआरपीएफ वाहन जाळलं**

पूर्ण राज्याच्या मागणीसाठी लडाखमध्ये हिंसक निदर्शने

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

श्रीनगर : लेहमध्ये केंद्रशासित प्रदेश लडाखला (डरवरज्ञह ींळेश्रशपीं ीींशींीी) पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा या मागणीसाठी हिंसक निदर्शने झाली. विद्यार्थ्यांची पोलिस आणि सुरक्षा दलांशी झटापट झाली. त्यांनी भाजप कार्यालयाला (डरवरज्ञह इगझे षषळलश ीर्शी प षळीश) आग लावली, पोलिसांवर दगडफेक केली आणि सीआरपीएफच्या वाहनाला आग लावली. गेल्या १५ दिवसांपासून उपोषण करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ हे विद्यार्थी आंदोलने करत होते. आंदोलकांनी आज बंदची हाक दिली होती, ज्यामुळे हिंसाचार झाला.

हिंसाचारानंतर वांगचुक म्हणाले, हा लडाखसाठी दुःखद दिवस आहे. आम्ही पाच वर्षांपासून शांततेच्या मार्गावर चालत आहोत. आम्ही उपोषण केलं, लेहहून दिल्लीपर्यंत पायी चाललो. आज, आम्ही शांतीचा संदेश अपयशी होताना पाहत आहोत. हिंसाचार, गोळीबार आणि जाळपोळ होत आहे. मी लडाखच्या तरुण पिढीला हे मूर्खपणा थांबवण्याचे आवाहन करतो. आम्ही आमचे उपोषण सोडत आहोत आणि निदर्शने थांबवत आहोत. या मागण्यांबाबत पुढील बैठक ६ ऑक्टोबर रोजी दिल्लीत होणार आहे. २०१९ मध्ये कलम ३७० आणि ३५अ रद्द करण्यात आले तेव्हा जम्मू आणि काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश बनले. राज्यातील परिस्थिती सामान्य झाल्यावर पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आश्वासन सरकारने दिले होते.

सरकारने मागणीला त्वरित प्रतिसाद दिला नाही किंवा कोणत्याही चर्चेचे संकेत दिले नाहीत. त्यामुळे, मंगळवारी सोनम यांच्या समर्थकांनी लेहमधील हिल कौन्सिल कार्यालयासमोर निदर्शने करण्याची योजना आखली. लडाख केंद्रशासित प्रदेश झाल्यापासून हिल कौन्सिल कार्यालय हे सर्वात महत्त्वाचे प्रशासकीय केंद्र आहे. आदल्या रात्री सोशल मीडिया चॅनेलद्वारे निषेधाचे आवाहन करण्यात आले.

बुधवारी सकाळी लेहमधील हिल कौन्सिल कार्यालयाबाहेर हजारो लोक जमू लागले. लडाख पोलिस आणि केंद्रीय सुरक्षा दलांनी आधीच बॅरिकेड्स उभारले होते. सुरुवातीला, निदर्शक आणि पोलिसांमध्ये वाद झाला, जो नंतर हाणामारीत रूपांतरित झाला. पोलिस आणि निदर्शकांमध्ये संघर्ष झाला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. तथापि, संतप्त जमावाने प्रथम पोलिसांचे वाहन पेटवून दिले आणि त्याची तोडफोड करण्यास सुरुवात केली. काही निदर्शकांनी जवळच्या भाजप कार्यालयात घुसून ते पेटवून दिले आणि तोडफोड केली. दगडफेकीत काही लोक जखमी झाल्याचे वृत्त आहे.

संपादकीय....

सरसावले मंत्रिमंडळ

बंगालच्या उपसागरात पुढील २४ तासात कमी दाबाचे क्षेत्र आणि चक्रीय स्थिती असल्याने राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलाय. पुढील ५ दिवसांत राज्यातील सर्वच भागात धुंवाधार पाऊसाचा इशारा आहे. विदर्भातील काही भागात २४ ते २७ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भातील काही भागात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलाय तर मराठवाड्यातील काही भागात आजपासून २९ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवलाय. मराठवाड्यात २७ सप्टेंबरला काही भागात पावसाची तीव्रता अधिक असणार आहे तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात २५ ते ३० सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाचा इशारा आहे. गेल्या चार दिवसांपासून धाराशिव, बीड, जालना, लातूर, परभणी सोलापूर अशा सगळ्याच जिल्ह्यात अतिवृष्टी झाली असून शेतकऱ्यांचा खरीप हंगाम पाण्याखाली गेलाय. गावोगावी नुकसानीच्या पंचनाम्यांना सुरुवात झाली आहे. काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूरसह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यात नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. विस्कटलेला संसार, मोडलेली घरं, झोपलेली पिकं आणि विस्कटलेली मनं जवळपास प्रत्येक घराला अंधाऱ्याच्या साम्राज्यानं ग्रासलंय. पुराच्या पाण्यानं सारं धुवून आणि खरवडून निघालंय. नजर जाईल तिथवर पाणी आणि नजरेतही न मावणारं पाणी... अवघ्या महाराष्ट्राच्या काळजाला घर पाडणारी आहे. कित्येक हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालंय. सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले दिसून येत आहे. शेती पिकांचे जनावरांचे घरांचे व्यावसायिकांचे खूप मोठे नुकसान झालेले असून पूरग्रस्त नागरिकांनी अशा संकटाच्या काळात धीर धरावा, राज्य शासन संकटकाळात पूरग्रस्तांच्या पूर्णपणे पाठीशी असून नागरिकांना सर्वोतोपरी मदत केली जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी नुकतीच दिली. अतिवृष्टी व पूर आल्यामुळे ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या सर्वांना शासनाकडून मदत दिली जाणार आहे. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पूरग्रस्तांना तातडीची मदत म्हणून दोन हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापुढेही पूरग्रस्तांना आवश्यक मदत देण्यासाठी शासन हात आखडता घेणार नाही. शासन टंचाई काळात ज्या निकषाप्रमाणे मदत करते त्याप्रमाणेच अती पावसात, ओल्या दुष्काळात ही मदत केली जाईल. मुख्यमंत्र्यांच्या ग्वाहीने अतिवृष्टीग्रस्तांना दिलासा मिळाला आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर अस्मानी संकट; केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले उद्या २५ सप्टेंबर रोजी पुरग्रस्त भागाची पाहणी करणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई दि.२४- रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले उद्या गुरुवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी पुरग्रस्त भागाची पाहणी करणार आहेत.मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. या पुरपरिस्थिमुळे मराठवाड्यातील शेतीची फार मोठी हानी झाली आहे.हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले उद्या पूरग्रस्त भागाची पाहणी करणार आहेत.मुंबईतुन रेल्वे ने सोलापुर ला जाऊन सोलापुर वरुन धाराशिव,लातुर,जालना या भागातील पूरग्रस्तांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणुन पुरग्रस्ताच्या झालेल्या नुकसानीचे पाहणी ना. राम दास आठवले करणार आहेत.त्यांनतर ते औरंगाबाद मार्गे दिल्लीला रवाना होतील.

मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे मोठे नुकसान झालेले आहे. अनेक गावात अतिवृष्टीमुळे मुकी जनावरे दगावली आहेत.शेतकऱ्यांची झालेली भरुन काढण्यासाठी राज्य शासनाने २हजार २१५कोटींचे पॅकेज जाहिर केले आहे.त्यानुसार तातडीने नुकसान झालेल्या पुरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यात येणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी अधिकृत घोषणा केलेली आहे. त्या अनुषंगाने केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले पुरग्रस्त भागाची पाहणी करुन शेतकऱ्यांना आधार देण्याचा प्रयत्न करणार आहेत. शेतकऱ्यांना अधिकाअधिक मदत मिळवून देण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे ना.रामदास आठवले प्रयत्न करणार आहेत.शेतकऱ्यांवर कोसळलेल्या या आसमानी संकटाच्या वेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले आणि रिपब्लिकन पक्ष ;

राज्य सरकार ; केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर उभे असल्याची ग्वाही ना. रामदास आठवले यांनी दिली आहे . पूरग्रस्त शेतकऱ्यांचे अश्रु पुसण्यासाठी ना. रामदास आठवले धाराशिव ; बोरगाव बोरखेडा; भूम परांडा; वाशी ; बीड ; लातूर आणि जालना या भागाची पाहणी करणार आहेत.

सरसकट ओला दुष्काळ जाहीर करा, राज ठाकरे यांचं मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे. राज्यातील अनेक भागांमधील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून महाराष्ट्रात सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली आहे. प्रशासनाने प्रती एकर ३० ते ४० हजार रुपये मदत जाहीर करावी, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली आहे. तसेच फक्त पक्षांतर्गत संघर्षासाठी नाही तर राज्यातील संकटावेळी सरकारमधील सर्व पक्ष दिल्लीत धाव घेतात हे दिसू द्या, असं म्हणत राज ठाकरे यांनी महायुती सरकारचे कानदेखील टोचले आहेत.

महाराष्ट्रात अतिवृष्टीने जो धुमाकूळ घातला आहे, त्याबद्दल तुम्ही पूर्णपणे अवगत असालच. महाराष्ट्राचा असा कुठलाही भाग शिल्लक राहिलेला नसेल जिथे अतिवृष्टीने नुकसान केलं नसेल. आमच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलल्यावर, लक्षात आलं आहे की, कित्येक ठिकाणी जमीन पूर्णपणे खरवडून वाहून गेलेली आहे. मे महिन्याच्या मध्यात जो पाऊस सुरु झाला आहे, त्याने जवळजवळ उघडीप घेतलीच नाहीये. त्यामुळे, शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे. ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. त्यामुळे सरकारने खालील सूचनांचा विचार करावा, असं म्हणत राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे. कुठल्याही निकषांच्या चौकटीत न लावता, सरसकट ओला दुष्काळ जाहीर करा. एकरी ७ आणि ८ हजार रुपये इतक्या तुटपुंजी नुकसान भरपाईने काहीही होणार नाही. त्याऐवजी एकरी किमान ३० हजार रुपये नुकसान भरपाई घोषित करा. कारण आता शेतकऱ्याची घडी बसायला किमान १ वर्ष लागेल. गेल्या काही वर्षातल्या बेफाम उधळपट्टीने, राज्याची आर्थिक स्थिती नाजूक झालेली असली तरी, सरकारने हात आखडता घेऊ नये. वेळेस केंद्राकडे पाठपुरावा करावा आणि मदतीचं पॅकेज केंद्राकडून मिळवावं. केंद्र सरकारने बिहारला असं पॅकेज या आधी दिलं आहेच त्यामुळे महाराष्ट्राला द्यायला काही हरकत नसावी. आणि त्यासाठी दिल्लीचा जो काही पाठपुरावा करावा लागेल तो करावा. फक्त स्वतःच्या वैयक्तिक तक्रारींसाठी किंवा घटक पक्षातील संघर्षासाठी आम्ही दिल्लीत जातो असं चित्र न दिसता, सरकारमधले सगळे पक्ष राज्यासाठी पण दिल्लीत धाव घेतात हे पण राज्याला दिसू दे. अशा आपत्तीचा पहिला फटका बसतो तो मुला-मुलींच्या शिक्षणाला. एकाही मुलाचं शिक्षण बंद होणार नाही. त्याला लागणारी वह्या-पुस्तकं मिळतील आणि अशा परिस्थितीत सहामाही परीक्षा देताना मुलांच्या मनाची काय स्थिती असेल याचा सरकारने विचार करून काही कृती तात्काळ करावी.

सर्व शिक्षकांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी समिती स्थापन; आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची घोषणा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील १०० टक्के अनुदानित शाळेतील शिक्षकांना शासनामार्फत वैद्यकीय प्रतिपूर्तीचा सध्या लाभ देण्यात येतो. यापुढे अंशदानित २० टक्के ते ८० टक्के अनुदानित शाळेतीलही सर्व शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्तीचा लाभ मिळावा, यासाठी आरोग्य सेवा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती करण्यात येईल, अशी घोषणा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली.

राज्यांतील विविध शिक्षक संघटना यांच्यासोबत या विषयावर मंत्री श्री.आबिटकर यांची आरोग्य भवन येथे बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला माजी आमदार कपिल पाटील, आरोग्य सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त डॉ.कादंबरी बलकवडे, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, शिक्षक संघटना प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

राज्यातील पोलीस विभाग, विक्रीकर विभाग आणि मुंबई उच्च न्यायालय येथील कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी कॅशलेस वैद्यकीय सेवा योजना यशस्वीपणे स्वीकारून ती राबविण्यात येत आहे. याच धर्तीवर ही योजना राज्यातील सर्व शिक्षकांसाठी राबविण्यासंदर्भात नियुक्त समितीने बैठका घेऊन अहवाल देण्याचे निर्देश आरोग्य मंत्री श्री.आबिटकर यांनी दिले. महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत राज्यातील सर्व जनतेला ५ लाखांपर्यंत आरोग्य सेवा लागू करण्यात आल्या आहेत. या योजनेतून २४०० पेक्षा अधिक उपचार हे शासकीय तसेच खाजगी रूग्णालयामार्फत करण्यात येत आहे. त्याचबरोबर शहरातील मोठे रूग्णालये या योजनेत समावेश करण्याबाबत प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे ही योजना शिक्षकांकरिता अधिक प्रभावीपणे राबविण्यात येईल, असे मंत्री श्री.आबिटकर यांनी सांगितले. राज्यातील अवयनदान करताना अवयव मिळणाऱ्या रूग्णांना वैद्यकीय सेवा सुविधेचा लाभ मिळत आहे. त्यामुळे यापुढे अवयव दान करणाऱ्या व्यक्तींनाही वैद्यकीय सेवा-सुविधा मिळण्याबाबत विचार करण्यात येणार असल्याचेही मंत्री श्री.आबिटकर यांनी या बैठकीत सांगितले.

अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शिक्षकांनाही आरोग्य सेवा कॅशलेस मिळावी यासाठी आरोग्य विभागाने धोरण तयार करावे, अशी मागणी शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली होती. राज्यात साडेसहा लाख शिक्षक आहेत. वैद्यकीय बिलांचे परिपूर्तीसाठी शिक्षकांना अनेकदा फेऱ्या माराव्या लागत होत्या. या निर्णयामुळे त्यांना दिलासा मिळणार आहे.

देशव्यापी सायबर सुरक्षा जनजागृती अभियानाचा २५ सप्टेंबरपासून शुभारंभ

नागरिकांसाठी महिनाभर देशव्यापी सायबर सुरक्षा व गोपनीयता जनजागृती अभियान; नागरिकांना सायबर सुरक्षा व गोपनीयतेच्या सर्वोत्तम पद्धतींबद्दल मार्गदर्शन होणार

मुंबई : डिजिटल सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी व सर्वांसाठी सुरक्षित सायबर व्यवहार निर्माण करण्यासाठी डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडियामार्फत २५ सप्टेंबर २०२५ रोजी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे 'रिंग द बेल फॉर सिक्युरिटी' या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानातून देशव्यापी सायबर सुरक्षा जनजागृती महिना २०२५ राबविण्यात येणार आहे.

या अभियानाचे उद्घाटन माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांच्या हस्ते होणार असून, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, तसेच गृहमंत्रालय, क्रेट-इन, सेबी आणि बीएसई यांचे मान्यवर या वेळी उपस्थित राहणार आहेत.

हे अभियान गृह मंत्रालयाच्या इंडिया सायबरक्राईम कोऑर्डिनेशन सेंटर, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, क्रेट-इन यांच्या सहकार्याने राबवले जात असून, उद्योगक्षेत्रातील भागीदार संस्थांनी या उपक्रमात योगदान दिले आहे.

हे अभियान नागरिक, संस्था व भागधारकांना सायबर सुरक्षिततेच्या चांगल्या सवयी आत्मसात करण्यास, सायबर सुरक्षा व गोपनीयतेच्या सर्वोत्तम पद्धती स्वीकारण्यास प्रोत्साहित करणार आहे. त्याचबरोबर, वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी नागरिकांना माहिती दिली जाईल आणि ऑनलाईन सुरक्षित राहण्याबद्दल मार्गदर्शन केले जाईल.

प्राध्यापक डॉ नाथिराम राठोड यांचा माधवबाग संस्थेच्या वतीने रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी

दिनांक २१ सप्टेंबर २०२५, शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे विभाग प्रमुख व याच विभागाचे दक्षिण रायगड जिल्हा समन्वयक डॉ. नाथिराम लक्ष्मण राठोड यांना नुकतेच माधवबाग हॉस्पिटल, खोपोली यांच्या वतीने रायगड जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. खोपोली येथे संपन्न झालेल्या विशेष कार्यक्रमामध्ये शिक्षक आमदार श्री ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते डॉ. नाथिराम राठोड यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र प्रदान करून विशेष गौरव करण्यात आला. खोपोली येथील माधवबाग हॉस्पिटल या आरोग्य व सामाजिक क्षेत्रात बहुमोल कार्य करणाऱ्या अग्रगण्य संस्थेच्या वतीने डॉ नाथिराम राठोड यांना हा पुरस्कार माधवबाग संस्थेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. गुरुदत्त आमीन, प्रशासकीय अधिकारी डॉ. राहुल जाधव इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत आमदार श्री ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

डॉ नाथिराम लक्ष्मण राठोड यांनी गेल्या पंचवीस वर्षाच्या आपल्या प्रदीर्घ सेवेमध्ये पोलादपूर तालुक्यातील उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. सुंदरराव मोरे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, उपप्राचार्य, व्यवसाय अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख, आजीवन अध्ययन विभागाचे विभाग प्रमुख इत्यादी विविध पदांच्या माध्यमातून डॉ. राठोड यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सोलापूर जिल्ह्याच्या अक्कलकोट तालुक्यातील सातन दुधनी हे डॉक्टर राठोड यांचे मूळ गाव असून त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर १९९८ या वर्षी स्थापन झालेल्या पोलादपूर येथील सुंदरराव मोरे महाविद्यालयाम ध्ये अर्थशास्त्र या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून आपल्या करिअरला सुरुवात केली. या महाविद्यालयाच्या सुरुवातीच्या काळात प्रभारी प्राचार्य पद सांभाळताना त्यांनी महाविद्यालयाच्या जडणघडणीम ध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः २००५ च्या महापुराम ध्ये महाविद्यालयाची इमारत संपूर्ण साधनसामुग्रीसह वाहून गेल्यानंतर महाविद्यालयाची पुन्हा उभारणी करण्यासाठी त्यांनी शिवाई शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाखाली विशेष परिश्रम घेतले. संशोधन क्षेत्रामध्ये देखील डॉ राठोड यांनी महाराष्ट्रातील आदिवासी विकासाच्या योजनांच्या अंमलबजावणी बद्दल सखोल संशोधन करून नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी) ही पदवी प्राप्त केली आहे. डॉ. राठोड यांनी विविध संशोधन नियतकालिकांमधून अर्थशास्त्र विषयक शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत, त्याचप्रमाणे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे आणि परिषदांमधून देखील त्यांनी आपल्या शोध निबंधांचे सादरीकरण केले आहे. मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रम निर्मिती मंडळ, पेपर सेटर इत्यादी विविध कमिट्यांवर देखील डॉ राठोड यांनी सदस्य म्हणून योगदान दिले आहे. आजीवन अध्ययन विभागात त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन मुंबई विद्यापीठाने त्यांची दक्षिण रायगड जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्ती केली. आजपर्यंतच्या आपल्या शैक्षणिक कार्यातून डॉ नाथिराम राठोड यांनी पोलादपूर सारख्या दुर्गम आणि डोंगरी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना माधवबाग संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले.

आपल्याला प्राप्त झालेल्या या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी आपल्या आई-वडिलांचा आशीर्वाद, तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांची बहुमोल साथ, तसेच,सुंदरराव मोरे महाविद्यालयाचे संस्थापक व माजी ग्रामविकास मंत्री कै प्रभाकरजी मोरे यांचे आशीर्वाद आणि शिवाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड. श्री संतोष काळे, उपाध्यक्ष ड. श्री विनोद देशमुख, सचिव श्री अशोकबंधू देशमुख, खजिनदार श्री किशोर मोरे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा सुनील बलखंडे आणि सर्व सहकारी, परिसरातील पालक आणि विद्यार्थी या सर्वांनी दिलेल्या मार्गदर्शन आणि सहकार्यामुळेच मी आज रायगड जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त करू शकलो असे मत डॉ राठोड यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले. यावेळी डॉ. राठोड यांनी या सर्वांचे तसेच माधवबाग या संस्थेचे विशेष आभार देखील मानले.

डॉ. नाथिराम राठोड यांनी प्राप्त केलेल्या या रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुनील बलखंडे, उपप्राचार्य डॉ महेश वल्ले, अधीक्षक श्री मुकुंद पंदेरकर तसेच, शिवाई शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व विश्वस्त मंडळ, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, महाविद्यालयातील सर्व कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक वर्ग या सर्वांनी डॉ. राठोड आणि त्यांच्या परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून भावी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा प्रदान केल्या आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

पूरग्रस्तांसाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीची मदत

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी पूरग्रस्तांना मदतकार्य करण्यात आले

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : बार्शी तालुक्यातील भोईंजे गाव व माढा तालुक्यातील सुलतानपूर येथील सिना नदीच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांसाठी खालील मदत साहित्य सुपूर्त करण्यात आले:

५०० अन्नपाकिटे

५०० लाडू प्रसाद पाकिटे

५०० पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या

ही सर्व मदत सामग्री सर्कल अधिकारी श्री. शिंदे साहेब यांचेकडे सुपूर्त करण्यात आली.

महाराष्ट्रात आकस्मिक आलेल्या पुराच्या संकटात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीमार्फत मानवतेच्या दृष्टीने मदतकार्य अविरतपणे सुरू आहे. माननीय सह-अध्यक्ष, मंदिरे समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्त बांधवांना वेळेत अन्नपाकिटे व आवश्यक साहित्य पुरविण्याचे कार्य सातत्याने राबविले जात आहे.

या मदतकार्यावेळी: सदस्य जळगावकर महाराज, सदस्या नडगिरे मॅडम, प्रभारी व्यवस्थापक श्री. पृथ्वीराज राऊत, लेखाधिकारी श्री. मुकेश आनेचा यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून अन्नपाकिटे व आवश्यक साहित्याची पाहणी करून पूरग्रस्त भागात पोहोचविण्याची व्यवस्था केली.

सर्वांच्या अविरत प्रयत्नांमुळे पूरस्थितीत अडकलेल्या बांधवांना अन्नपाकिटे, पिण्याचे पाणी व लाडू प्रसाद वेळेवर पोहोचविण्यात आले असून, यामुळे पूरग्रस्तांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सोलापूर हाय फ्लायर्स राऊंड टेबल ३०९ ने सामाजिक व आरोग्य उपक्रमातून जपली सामाजिक बांधिलकी

सोलापूर (दि. २४) सोलापूर हाय फ्लायर्स राऊंड टेबल ३०९, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र महोत्सवाच्या पहिल्या मंगळवारी जोडभावी पेठ येथे आयोजित डंकापूजा वेळी जगज्योती, जोगतीन व तृतीयपंथी, पर्डीधारक महिला, सामान्य महिला यांच्याकरिता मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नवरात्र उत्सवामध्ये येणाऱ्या पहिल्या मंगळवारी डंकापूजा करण्याची परंपरा आहे. तुळजापूरच्या दिशेने तोंड करून उभे राहून पाच छोटे दगड पान सुपारी एका रांगेत मांडून त्यावर हळदीकुंकू वाहून कापूरचा दिवा लावून पूजन करण्यात येते. त्यानंतर नारळ चढवून देवीचा जागर करत एकमेकांची गळाभेट घेण्यात येते. यावेळी मोठ्या भक्तीमय वातावरणात व उत्साहात आई राजा उदो उदोच्या जयघोषात डंकापूजा पार पडली.

यावेळी बोलताना डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, डंका महोत्सव ही पूजा नसून सोलापूरच्या समृद्ध सांस्कृतिक, परंपरेचा एक भाग आहे. समाजातील विशिष्ट घटक एकत्रित येऊन आपली ओळख आणि श्रद्धा जपतो. जोडभावी पेठेत हजारो लोक तुळजापूरच्या दिशेने तोंड करून तुळजाभवानीची आरती करतात. आरती पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होते. सोनेरी रथातून जोडभावी पेठेतील उत्सवाच्या ठिकाणी तृतीयपंथीयांच्या आराध्य देवीचे वाजत, गाजत आगमन होते. यावेळी भक्त जागेवरून देवीची आरती करून हजारो जगज्योती, तृतीयपंथीय भक्तांनी पूजन व देवीचा जागर करतात.

यावेळी सोलापूर हाय फ्लायर्स राऊंड टेबल ३०९ चेअरमन आशिष तापडिया, व्हाईस चेअरमन अभिजीत मालानी, सचिव अभिषेक जामवर, खजिनदार पंकज सचदेव, माजी अध्यक्ष पुष्कराज कोठारी, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

डंका पूजा वेळी आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात ४८० जणांची तपासणी करण्यात आली. ७४ तृतीयपंथी, २३० जगज्योती व जोगतीन, १७६ सामान्य नागरिकांचा समावेश होता. हिम ोग्लोबिन, शुगर, आय.सी. टी. सी. आदी रक्ताच्या तपासण्या करण्यात आल्या, या सोबतच रक्तदाब, वजन व सामान्य तपासणी करून व औषध गोळ्या देण्यात आल्या. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय एन. एस. एस. विभागाच्या मुला-मुलींनी उपस्थित असलेल्या जनसमुदायात माहिती पत्रकांचे वाटप करून शिबिरात उपलब्ध सेवा सुविधा विषयी जागृती केली. फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक यांनी रुग्णांची तपासणी केली. लॅब टेक्निशन व्यंकटेश कंची यांनी रक्ताच्या तपासण्या केल्या, अधिपरिचारिका रोजमेरी गायकवाड यांनी औषधे वाटप केली, परिचारिका आशालता मस्के यांनी रुग्णांची नोंदणी केली, लक्ष्मी पारवे, ओम पाटील, कांचन पवार यांनी समुपदेशनाचे काम केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार आशिष कापडिया यांनी मानले.

जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत एमआयटी विश्वशांती गुरुकुलची उल्लेखनीय कामगिरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर: सोलापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय डी. एस.ओ जलतरण स्पर्धा २०२५-२६ मध्ये वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व कामगिरी करत यश संपादन केले आहे. विविध वयोगटात झालेल्या जलतरण स्पर्धांमध्ये संस्कृती कटारिया हिने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात १०० मीटर फ्री स्टाईल, १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक आणि २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक जलतरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. १४ वर्षाखालील मुलांच्या

गटात १०० मीटर फ्री स्टाईल, ५० मीटर बटरफ्लाय, २०० मीटर वैयक्तिक मेडल व रिले स्पर्धेत ओम पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला. दुसरीकडे ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये विहान पाटील याने प्रथम तर विश्वराज भुसारे द्वितीय आला. याशिवाय १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये विश्वराज भुसारे प्रथम आणि विश्वजित साळुंखे याने द्वितीय

क्रमांक मिळवून यश संपादन केले. वरद नगिमे याने ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकम ध्ये प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. यानंतर झालेल्या १४ वर्षांखालील मुलांच्या ४ द १०० फ्री स्टाईल (रिले) जलतरण स्पर्धेत शाळेच्या विश्वजित साळुंखे, विहान पाटील, ओम पाटील आणि पार्थ अभंग यांच्या रिले संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व अशी कामगिरी करत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्रता मिळवत शाळेचा झेंडा उंचावला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी म्हणाले 'आमच्या विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द व घेतलेले परिश्रम हीच त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे आणि विभागीय स्पर्धेतही आमचे विद्यार्थी नक्कीच यशस्वी होतील याची आम्हाला खात्री आहे.' यावेळी त्यांनी जलतरण प्रशिक्षक साहिल राणा यांच्या मार्गदर्शन व प्रशिक्षणाचा विशेष उल्लेख केला. यावेळी संस्थेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि आगामी स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री. तुळजाभवानी पोषाखासह अलंकार परिधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे तिस-या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस श्री. तुळजाभवानी पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

रूक्मिणी मातेस मण्यां म ोत्याच्या पाटल्या,सोन्या मोत्याचे तानवड जोड, सूर्य, मोठी नथ, कर्णफुले जोड, पुतळ्यांची माळ, पैंजण जोड, रूळ जोड, मस्त्य जोड, मोत्याचा तुरा, मोत्याचे मंगळसूत्र, पेठ्याची बिंदी, सरी लहान, खड्याची वेणी, चिंचपेटी हिरवी, ठुशी, जडावाचा हार, नवरत्नाचा हार, मोत्याचा कंठा इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठ्या जोड, हिऱ्याचे कंगण जोड, शिरपेच १० लोलक असलेला, तोडे जोड, एकदाणी, हायकोल, शाळीग्राम हार, जवेची माल २ पदरी, पैंजण जोड, बोरमाळ मोठी ३ पदरी, मोत्याचा तुरा इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस सिद्धेस्वर टोप, जवमनी पदक, चिंचपेटी तांबडी, जवेची माळ, पुतळ्यांची माळ व सत्यभाम ादेवीला नक्षी टोप, हायकोल जवेची माल, मोहराची माळ, लक्ष्मीहार इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे.

श्रीस परिधान करण्यात येणारे अलंकार अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन व दुर्मिळ आहेत. या अलंकाराचे 'मकर कुंडले तळपती श्रवणी। कंठी कौस्तुभमणी विराजित।' यांसारख्या अनेक अभंगांतून संतांनी वर्णन केलेले आहे. नवरात्र महोत्सवानिमित्त श्री विठ्ठलास नऊ दिवस पोषाखावेळी अलंकार व रूक्मिणीमातेस विविध प्रकारचे पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात येत असल्याने, भाविकांची मोठी गर्दी होत आहे. सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि सन्मानिय सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सवातील सर्व प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

निफाड येथे सिम्बॉल ऑफ नॉलेज फाऊंडेशन तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी

सिम्बॉल ऑफ नॉलेज फाउंडेशनच्या वतीने काँग्रेस भवन निफाड येथे गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले..

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहन आढागळे, तसेच व्याख्यान कर्ते प्रा. ज्ञानोबा ढगे ,मंगेश भन्साली यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. बक्षीस वितरण दिनाचे प्रसंगी प्राध्यापक ज्ञानोबा ढगे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते,शिक्षक दिनाचे औचित्य साधून चांदोरी येथे सिम्बॉल ऑफ नॉलेज या बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने संविधान जनजागृती स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते .

या परीक्षेमध्ये ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून वयानुसार दोन गटात ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक गटातून पाच विद्यार्थ्यांची निवड करुन या गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थितांचे हस्ते सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले तर उर्वरित विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले,

या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राकेश निकाळे, उपाध्यक्ष दादाराव काऊतकर, सचिव प्रेम वाघ, खजिनदार विनोद गायकवाड , सल्लागार एड. राहुल गायकवाड, सहसचिव प्रवीण कोळी सदस्य सुनील साळवे, दादाराव पंडित, राहुल उन्हवणे, विक्रम आढाव यांनी परिश्रम घेतले असून या प्रसंगी विद्यार्थी पालक , वकील, पत्रकार , शैक्षणिक सामाजिक व राजकीय, क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.....

सूत्रसंचालन राहुल उन्हवने यांनी केले तर आभार राकेश निकाळे यांनी मानले.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर नवरात्र संगीत महोत्सवाची उत्साहात सुरुवात

कलापिनी कोमकली यांनी पहिली गायनसेवेची माळ विठूमाऊली चरणी गुंफली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

श्रीक्षेत्र पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने प्रतिवर्षाप्रमाणे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि सन्मा. सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके साहेब प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत साहेब लेखाधिकारी मुकेश आणेचा यांचे उपस्थितीत दिनांक २३ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर सात दिवस दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत चालू असणाऱ्या नवरात्र संगीत महोत्सवाची पहिल्या स्वर माळेची सुरुवात आंतरराष्ट्रीय किर्तीच्या तसेच कुमार गंधर्व यांच्या कन्या विदुषी कलापिनी कोमकली यांच्या

स्वरांनी गुंफली.सुरुवातीला श्री ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, शकुंतला नडगिरे मॅडम कलापिनी कोमकली,पृथ्वीराज राऊत साहेब लेखाधिकारी मुकेश आणेचा,संजय कोकीळ यांचे शुभहस्ते विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून झाली.

सुरुवातीला कलापिनी कोमकली यांनी राग कल्याण मध्ये शिव शिव आणि तीनताला मध्ये एक मुरलीया तार दे या कुमारजींच्या बंदिशी गात अभिजात शास्त्रीय संगीताची मेजवानी देत अनेक प्रसिद्ध सगुण निर्गुण भजनांनी त्यामध्ये सुंदर ते ध्यान, हरी कहेरे गये, ब्रीज नगरी में, लक्ष्मी वल्लभा, राम निरंजन, उड जाएगा, आदी रचना गात वडील पं. कुमार गंधर्व यांच्या आठवणींना उजाळा दिला.त्यांनतर त्यांनी सुनता है गुरु ग्यानी, या रचनेने कार्यक्रमाची सांगता केली.त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला श्रीधर मांढरे, हार्मोनियम स्वानंद कुलकर्णी पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे टाळ माऊली पिसे यांनी करत कार्यक्रमाला रंगत आणली. सुत्रसंचनलन विक्रम बिस्किटे यांनी केले. यावेळी पाऊस असताना सुद्धा पहिल्याच दिवशी पंढरपूर कला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित प्रतिसाद दिला पुढे २९ तारखेपर्यंत चालणाऱ्या महोत्सवास उदंड प्रतिसाद देण्याचे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती यांचे वतीने करण्यात आले.हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती कर्मचारी वर्ग अधिक परिश्रम घेत आहेत

मुख्यमंत्री यांनी थेट बांधावर येऊन केली पूर परिस्थितीची पाहणी

आमदार अभिजीत पाटील यांच्या माढा मतदारसंघात मुख्यमंत्र्यांनी केली पूर पाहणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

माढा/पंढरपूर प्रतिनिधी : आमदार अभिजीत पाटील यांच्या माढा मतदारसंघातील सिना दारफळ व निमगाव माढा येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी पूर परिस्थितीची पाहणी केली.

माढा मतदारसंघाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांनी या सर्व पूर पाहणीची माहिती मुख्यमंत्री यांना दिली. आमदार अभिजीत पाटील यांनी सरसकट पंचनामे करून शेतकरी तसेच दुकानदार व्यापारी व अनेक शेतकऱ्यांची त्यांना तत्काळ खरगोश मदत मिळावी यासाठी

सरसकट पंचनामे करून तात्काळ मदत मिळावी आमदार पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आमदार अभिजीत पाटील यांनी मागणी केली. यावेळी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, खा-सदार धैर्यशील मोहिते पाटील, माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, माढाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते..

अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच मदत : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आश्वासन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (जिमाका) :- सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व सीना नदीला आलेल्या पुरामुळे शेती, घर व पशु-धनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना शास-नातर्फे लवकरच मदत दिली जाईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

कोर्टी (ता. करमाळा), मुंगशी (ता. माढा), लांबोटी (ता. मोहोळ) या भागांतील पूरग्रस्त परिस्थितीची पाहणी उपमुख्यमंत्री पवार यांनी केली.

यावेळी आमदार नारायण आबा पाटील, अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता धीरज साळी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, करमाळा, माढा, मोहोळ तालुक्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे प्रचंड नुकसान झाले असून राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे

आहे. पुरात अडकलेल्या नागरिकांचे सुरक्षित स्थळी पुनर्वसन करावे, त्यांना अन्न, पाणी, वीज व औषधांची सुविधा पुरवावी, तसेच ज्यांचे धान्य भिजले आहे त्यांना तात्काळ धान्य उपलब्ध करून द्यावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे उडीद, मका, सोयाबीन, तूर आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, घरांचे व पशुधनाचेही नुकसान झाले आहे. सर्व नुकसानग्रस्त घटकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, असे निर्दे शही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांसाठी महामुनी मंगल कार्यालय, संगोबा रोड, करमाळा येथे तात्पुरते पुनर्वसन केंद्र उभारण्यात आले असून उपमुख्यमंत्री पवार यांनी त्या ठिकाणी भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. यावेळी शेतकऱ्यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची म ागणी केली.

कल्याणशेट्टी महाविद्यालयाकडून शेतकरी आधार रॅली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/अक्कलकोट : म हर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वती-ने विद्यार्थी व शिक्षकांनी अतिवृष्टीत विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा समाजासमोर मांडण्यासाठी शेतकरी आधार रॅली काढून एकात्म तेचा संदेश दिला.

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाच्या निमित्ताने ही रॅली आयोजित करण्यात आली होती. शेतकरी राजा घाबरू नकोस, उद्याचा दिवस तुझा आहे, आम्ही तुझ्या सोबत आहोत आपण सर्व एक आहोत या घोषणांनी परिसर दुम दुमून गेला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम

महाविद्यालय, हन्नूर चौक, एसटी स्टँड, ए वन चौक मार्गे रॅलीतील विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांसोबत रहा अशा घोषणा दिल्या. रॅलीचे संयोजन कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले. रॅलीमध्ये प्रा सौरभ भस्मे, प्रा मनीषा शिंदे, प्रा शिल्पा धुमशेट्टी, प्रा मधुबाला लोणारी, प्रा जनाबाई चौधरी, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा भीम सोनकांबळे सहभागी झाले.

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष सचिन दादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी कौतुक केले.

समाजाने शेतकऱ्यांना आधार द्यावा

शेतकऱ्यांची प्रचंड आर्थिक हानी झाली आहे. तो विस्थापित झाला आहे, त्याला आधार देण्यासाठी समाजातील सर्व घटकानी एकवटले पाहिजे. व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या शेती मालाला भाव दिला पाहिजे असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी रॅली नंतर शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले.

आमदार अभिजीत पाटील यांनी केले आवाहन

एक हात मदतीचा; आपल्या माढेकरांना

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

माढा/पंढरपूर/ : गेल्या ३-४ दिवसांपासून माढा तालुक्यातील सीना नदी काठच्या गावांना पूर परिस्थितीने अतिशय नागरिकांची बिकट अवस्था झाली असून शेतकऱ्यांचे हाल झाले आहेत. शेतात उभी असलेली पिकं जमीनदोस्त झाली, घराघरांमध्ये पाणी शिरून उभा अस-लेला संसार मोडला आहे.

या प्रसंगांमध्येच मी देखील माझ्या परीने पिण्याचे पाणी आणि

जेवण पोहोचवण्याचं कामही युद्धप-ातळीवर सुरु आहे. आपण देखील या परिस्थितीत शक्य होईल ती मदत प्रत्येकानं करावी. मोडलेला संसार उभा करताना अत्यावश्यक साहित्य, घरउपयोगी वस्तू, कपडे आणि अन्नधान्य पोहचविण्यासाठी आपण देखील खारीचा वाटा उचल-ावा. माढा मतदारसंघातील परंतू पुणे, मुंबई अशा मोठ्या शहरांमध्ये स्थायिक असलेल्या उद्योजक, अधिकारी, नोकरदारांनी आपल्या गावासाठी, आपल्या तालुक्यासाठी शक्य होईल ती मदतीचा हात पुढं करावा.

परिस्थिती खरंच फार गंभीर आहे. रात्रीचा दिवस करून

लोकांसाठी काम सुरू आहे. आ-पणही हातभार लावाल हिच माफक अपेक्षा, हिच वेळ आपल्या लोकांना उभारी देण्याची आहे..

महाराष्ट्र वीज कामगार महासंघातर्फे पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीस पाच लाखाची मदत जाहीर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

महाराष्ट्रात सध्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची घरे शेती जमीन मोठ्या प्रमाणात वाहून गेल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील अनेक गावांमध्ये पिके नष्ट झाली असून , गुरे, ढोर संसार शेतातील माती वाहून गेल्यामुळे शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. बरेच शेतकरी पुरात वाहुन गेल्यामुळे मृत्यूमुखी पडले आ-हेत. मराठवाड्यातील परिस्थिती गंभीर आहे.

शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा परिणाम झाला असून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस व त्यांचे प्रशासन सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. व निश्चितपणे शेतकर्यांच्या पुनर्वसनासाठी योग्य त्या उपाययोजना ते करतील व करत आहेत.आर्थिक मदतीची घोषणा ही त्यांनी केलेली आहे. परंतु

या सर्व परिस्थितीला सरकार एकट पुरू शकत नाही .व सर्वांनी मदतीला पुढे आले पाहिजे अशी आमची भावना आहे.

आमची महाराष्ट्र वीज कामगार महासंघ ही संघटना भारतीय मजदुर संघाची शाखा आहे.भारतीय मजदुर संघ ही निव्वळ कामगार संघटना नाही तर राष्ट्र प्रथम हा विचार घेऊन चालणारी स्वर्गीय दत्तपंत ठेंगडी जी यांच्या विचाराने प्रेरित असलेली संघटना आहे.आणि म्हणून भारतीय मजदुर संघाची महाराष्ट्रातील सर्वात प्रबळ असलेली संघटना म्हणुन आ-ळख असलेल्या वीज कामगार महासंघाने तातडीने मुख्यमंत्री सहायता निधीस मदत म्हणून देणगी देण्याचा निर्णय घेतला आहे.

या पूर्वीही आम्ही राज्यात व देशात निर्माण झालेल्या गंभीर पूर परिस्थिती व कोरोना सारख्या आपत्कालीन परिस्थितीत शासनाच्या पाठीशी राहून आर्थिक तसेच सर्वपरी मदत केली आहे.

त्यामुळे आज महाराष्ट्रात निर्माण झालेल्या अतिवृष्टी व गंभीर पूर परिस्थितीमध्ये खा-रीचा वाटा म्हणून, महाराष्ट्र वीज कामगार महासंघ मुख्यमंत्री सहायता निधीस पाच लाखाची मदत जाहीर करत आहे. याउ-परही आम्ही मदतीसाठी सतत तत्पर राहू ही ग्वाही देत आहोत, असे अध्यक्ष महाराष्ट्र वीज काम गार महासंघ विठ्ठल भालेराव व महामंत्री महाराष्ट्र वीज कामगार महासंघ अरुण पिवळ यांनी म्हटले आहे.

गोगावंच्या सरपंच वनिता सुरवसे यांची मागणी

राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याचे अधिकार द्या

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट प्रतिनिधी : माहे ऑगस्ट, सप्टेंबर २०२५ या कालावधी मध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस पडून राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, राज्यात एकूण २२ हजार ग्रामपंचायती आहेत, लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीला नुकसानग्रस्त शेती व पिके, शेतामधील फुटलेले बांध, गावातील पडलेले घरे, यांच्याकरिता मदत करता येईल असा शासन निर्णय तात्काळ काढावा अशी विनंती सरपंच परिषदेच्या सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हा समन्वयक तथा गोगावच्या सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी केली आहे.

ज्या ग्रामपंचायतीची ऐपत आहे ती नक्कीच पुढाकार घेऊन नुकसानग्रस्त व बाधित शेतकऱ्यांना गावकऱ्यांना मदत करेल. काही ग्रामपंचायतची ऐपत असून मदत करता येत नाही.तसा शासन निर्णय माहितीत नाही, संकटकाळी सर्व गावकऱ्यांच्या तक्रारी सरपंचाच्या कडेच असतात, सरपंच हतबल झालेला असतो, त्याला मदत करायची खूप इच्छा असते पण काही करता येत नाही, संकटकाळी मदत करण्याकरता राखीव निधी सुद्धा ग्रामपंचायतला उपलब्ध करून देण्याची विनंती सरपंच सुरवसे यांनी केलेली आहे. घराघरापर्यंत पोहोचणारा व्यक्ती म्हणजे सरपंच, ग्रामसेवक व तलाठी असतात पण त्यांच्या हाती बांधावर जाऊन पंचनामा करण्याच्या व्यतिरिक्त काही अधिकार नाही, ज्यांचे घर उध्वस्त झाले,ज्यांची शेती उध्वस्त झाली आहे हे डोळ्यासमोर दिसत आहे पण ग्रामपंचायत मधून काहीच मदत करता येत नाही अशी राज्यातील सर्व सरपंचाची खंत आहे, सरकार नी २२०० करोड ची मदत जाहीर केली त्याबद्दल त्यांचे मनः पूर्वक आभार. पण सरकारला प्रत्येक कुटुंबा नुसार सत्य परिस्थिती माहीत आहेच अशी नाही, सरसकट मदत करणे ही वेगळी बाब आहे पण ज्यांचे खरेच जास्त नुकसान झाले आहे त्यांना जास्त मदत मिळायलाच पाहिजे आणि ही खरी मदत सर्व ग्राम पंचायती नक्की करू शकतात, त्याचा त्यांना अधिकार मिळायला हवा. अधिकार दिल्यास सर्व ग्रामपंचायती त्यांच्यात्यांच्या आयपतीनुसार ५ लाख ते ५० लाखापर्यंत मदत करू शकतील.

शासनाने तात्काळ तसे आदेश काढावे व हेक्टरी ५००००/- सरसकट मदत तात्काळ जाहीर करावी, सर्व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, नदी, नाले, ओढे, कॅनल फुटून ज्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे त्यांची शेती पूर्ववत करून द्यावी अशी विनंती सरपंच सुरवसे यांनी केली आहे. गावातील सर्व ट्रस्ट, गाव-ातील दानशूर व्यक्ती,सर्व मंडळे, विविध सामाजिक संघटना यांनी आपापल्या गावात पुढाकार घेऊन जास्तीत जास्त नुकसानग्रस्त बळीराजाला मदत करावी असे आव्हान ही सरपंच सुरवसे यांनी केले आहे.

भिवंडी वाडा महामार्गाच्या दुरुस्तीला १३५ कोटींचा निधी मंजूर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी वाडा मनोर रस्त्याच्या दुरुस्तीला सार्वजनिक बांधकाम विभाग कडून १३५ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लवकरात लवकर निधी मंजूर करावा अशी मागणी भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खा. सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी केली होती.

खा. बाळ्या मामा यांच्या प्रयत्नांना यश

भिवंडी वाडा मनोर रस्त्याची सध्या प्रचंड दुरावस्था झाली असून या मार्गावरून प्रवास करताना अनेक नागरिकांचा बळी गेला आहे. नागरिकांनी अनेक आंदोलने व तक्रारी केल्या नंतरही रस्त्याची परिस्थिती जयसे थे, अशीच होती.

या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी खा. बाळ्या मामा यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची वेळोवेळी भेट घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीसाठी त्वरित निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती.खा. बाळ्या मामा यांच्या विनंती व मागणीची दखल घेत मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी भिवंडी वाडा मनोर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी १३५ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

यारस्त्याच्यादुरावस्थेबाबत आपण सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची अनेक वेळा भेट घेतली होती. प्रत्येक भेटी दरम्यान त्यांनी या रस्त्याला लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. आता या रस्त्याला १३५ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याने लवकरच रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार असून नागरिकांचा प्रवास सुखकर होणार आहे अशी प्रतिक्रिया खा. बाळ्या मामा यांनी दिली आहे.